(152)

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे यांचे कार्यालय
सेनापती बापट रोड, मुथ्था चेंबर्स-२, पुणे १६.
जा.क्र. झोपुप्रा/सप्रा-३/352/२०१८
दिनांक :- 23/04 /२०१८

## जाहीर प्रकटन

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची स्थापना महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ चे कलम ३ नुसार महाराष्ट्र शासन अधिसूचना झोपुयो २००४/प्र.क्र. २१३/झोपुसु १, दि.३०/०६/२००५ अन्वये करण्यात आलेली आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, झो.पु.प्रा. यांनी उक्त अधिनियमाच्या कलम ३ (वाय) मधील तरतुदीनुसार वस्तीचे सर्व्हेक्षण करुन झोपडपट्टीधारकांची पात्रता निश्चित करुन त्याबाबतची अंतिम यादी (परिशिष्ट-२) तयार करण्याचे अधिकार उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी, यांना प्रदान केलेले आहेत.

खालील परिशिष्टात नमुद केलेल्या ठिकाणचे वस्तीत राहणारे सर्व झोपडपट्टीवासीय, भाडेकरु, पोटभाडेकरु तसेच फोटोपासधारक व इतर या सर्वांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, विषयांकित मिळकतीवरील शासकीय जागेवरती शासनामार्फत आरोग्य विषयक प्रकल्प राबविणेचे प्रस्तावित असलेबाबत 'महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, ससून सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे -०१' यांनी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे या कार्यालयास कळविले आहे त्यानुसार सदर जागेवरील झोपडपट्टी धारकांचे या कार्यालयाने नियुक्ती केलेली संस्था नामे 'नवनिर्माण महिला बहुऊद्देशीय संस्था, पुणे' यांचेमार्फत प्राथमिक सर्व्हेक्षण करण्यात आलेले असून त्यानुसार पात्र व अपात्र झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) या कार्यालयाने तयार केलेली आहे.

सदर झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) परिशिष्ट 'अ' मध्ये नमूद केलेल्या मिळकतीवरील झोपडपट्टीमध्ये ठळक दर्शनी ठिकाणी, या कार्यालयाच्या नोटीस बोर्डवर दि.२३/०४/२०१८ रोजी प्रसिध्द करण्यात येत आहे. विषयांकित मिळकतीवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील प्राथमिक यादीत अपात्र ठरलेल्या झोपडीधारकांनी हरकत अर्ज दाखल केलेले नाहीत. तरी परिशिष्ट-अ मध्ये नमुद मिळकतीवरील झोपडपट्टीत राहणाऱ्या सर्व झोपडीधारकांनी प्रसिध्द होणारी अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) पाहून आपले पात्रतेची खात्री करावी. तसेच सदर पात्रता यादी या कार्यालयात कार्यालयीन वेळेत पाहणेसाठी सुध्दा उपलब्ध आहे.

## परिशिष्ट 'अ'

| विकसकाचे नाव | झोपडपट्टीचे ठिकाण | झोपडपट्टीचे एकूण क्षेत्र (चौ.मी) | एकूण झोप-डयांची संख्या | पात्र झोपडीधारकांची संख्या | अपात्र झोपडीधारकांची संख्या | चतु:सिमा |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रस्ताव प्राप्त नाही. | स.नं. ९४/१अ/१, वाल्मिकी नगर, आरोग्य भवन, येरवडा, पुणे | सुमारे १४४९.५० चौ.मी. | ५१ (सार्वजनिक इमारतीसह) | एकूण पात्र = १४<br>निवासी पात्र = १४<br>बि.निवासी पात्र =० | एकूण अपात्र = २८<br>निवासी अपात्र = २७<br>बि.निवासी अपात्र= १ | पूर्व- पुणे-आळंदी रोड<br>पश्चिम-स.नं.९४ पैकी उर्वरित क्षेत्र<br>दक्षिण- स.नं.९४ पैकी उर्वरित क्षेत्र<br>उत्तर- स.नं.९४ पैकी उर्वरित क्षेत्र |

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

२३/०५/१८

उप जिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी
क्र.३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,
पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे.

o/c

प्रत :-

१) श्री. प्रविण गुलगे, सर्व्हेक्षक, झो.पु.प्रा., पुणे :- सदरचे जाहीर प्रकटन स.नं. ९४/१अ/१, वाल्मिकी नगर, आरोग्य भवन, येरवडा, पुणे मिळकतीवरील झोपडपट्टीतील सर्वांचे निदर्शनास येईल अशा दोन ते तीन दर्शनी ठिकाणी, सर्व झोपडीधारकांना दिसेल, समजेल अशा रीतीने प्रसिद्ध करावे. उपरोक्त जाहीर प्रकटन प्रसिद्ध केलेचा पंचनामा करावा. जाहीर प्रकटन प्रसिद्धीचे छायाचित्र काढावे. उपरोक्त जाहीर प्रकटनाची विषयांकीत मिळकतीवरील झोपडीधारकांमध्ये जास्तीत जास्त ठिकाणी पारदर्शक पद्धतीने प्रसिद्धी करावी व केलेल्या कार्यवाहीचा परिपूर्ण अहवाल, पंचनामा उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३, झोपुप्रा, पुणे यांचेकडे दयावा.

२) श्री. दिनेश रोकडे (संगणक अधिकारी), झो.पु.प्रा.,पुणे :- उपरोक्त जाहिर प्रकटन व अंतिम पात्रता यादी झो.पु.प्रा.पुणे. च्या वेब साईटवर अपलोड करणेत यावी.

**दि.०१/०१/ २००० या अर्हता दिनांकापमाणे अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट - २) चा गोषवारा**

**झोपडपट्टीच्या मिळकतीचे वर्णन : -स.नं.९४/१अ/१, आरोग्य भवन, येरवडा, पुणे**

**संदर्भ : १) संचालक-प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, ससून सर्वोपचार रूग्णालय परिसर, पुणे १ यांचेकडील पत्र जा.क्र.ममाआसं/पुणे/जागा-येरवडा/२०१८/१८१-८३ दि.२३/०१/२०१८**

**२) शासन निर्णय क्रमांक : टिपीएस-१८१२/७८६/प्र.क्र.२६२/१३ पुर्नबांधणी क्र.९०/नवि-१३, दि.११/०९/२०१४**

**३) शासन निर्णय क्रमांक : झोपुधो-१००१/प्र.क्र.१२५/१४/झोपसु-१, दि.१६/०५/२०१५**

| झोपडपट्टीचे नाव -स.नं.९४/१अ/१, आरोग्य भवन, येरवडा, पुणे मिळकतीवरील झोपडीधारकांची अंतिम पात्रता यादी (परिशिष्ट-२) | | प्रसिध्द दि.२३/०४/२०१८ |
|---|---|---|
| १ | एकुण झोपडयांची संख्या | ५१ |
| २ | एकुण संमतीपत्रांची संख्या | - |
| ३ | एकूण संमती दिलेल्या झोपडीधारकांची टक्केवारी | - |
| ४ | एकुण निवासी झोपडयांची संख्या | ४१ |
| | एकुण पात्र निवासी झोपडयांची संख्या | १४ |
| | एकुण अपात्र निवासी झोपडयांची संख्या | २७ |
| ५ | एकुण बिगरनिवासी झोपडयांची संख्या | १ |
| | एकुण पात्र बिगरनिवासी झोपडयांची संख्या | ० |
| | एकुण अपात्र बिगरनिवासी झोपडयांची संख्या | १ |
| ६ | एकूण इतर बांधकामे ( मंदिर / दर्गा / अंगणवाडी / शौचालय इ.) | ९ |
| ७ | झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस / विकसक यांना संमती दिलेल्या पात्र झोपडीधारकांची संख्या | - |

(प्रविण गुलगे)
सर्व्हेक्षक
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

(सी. एच. बागल)
नायब तहसिलदार (से.नि.)
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे

( दत्तात्रय कवितके)
उपजिल्हाधिकारी तथा सक्षम प्राधिकारी क्र.३
झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे.

झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण स्थापना ३०/६/२००५ पुणे

१८